
ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३४ | पुणे, बुधवार, २ ऑक्टोबर, १९६८ | अंक १९



### लोकसंख्यावाढीचा मेलेल्यांनाही धोका!

लोकसंख्येच्या वाढीमुळे जिवंत माणसांच्या भवितव्यास धोका निर्माण झाला आहे, तसा तो मरणारांनाही होणार आहे. कबरस्थाने उकरून काढून तेथे रस्ते, कारखाने, इमारती उभारली जात आहेत; कबर हे अखेरचे विश्रांतिस्थान ह्यापुढे राहणार नाही, अशी परिस्थिति अमेरिकेत निर्माण होऊ पाहात आहे. जपानमध्येही कबरस्थानात एवढी गर्दी झाली आहे, की आता राजघराण्यातील लोक आणि इतर काही प्रतिष्ठित लोक ह्यांच्या-खेरीज बाकीच्यांना पुरले जाण्याची संधी मिळणार नाही; त्यांचे दहनच केले जाणार. कुणाची रक्षा पुरली जावी आणि कुणाची डब्यांत ठेवली जावी, हे ठरविण्यासाठी वर्षातून दोनदा लॉटऱ्यांतून नावे काढली जातात. पश्चिम बर्लिनमधील दोन-पंचमांश लोक ६५ वर्षांच्यापेक्षा ज्यास्त वयाचे आहेत. तेथे दरसाल ४०,००० मृत्यू होतात. त्यांना कबरस्थानात जागा मिळविण्यासाठी सहा सहा आठवडे थांबावे लागते! त्यामुळे, दहनाकडे प्रवृत्ती वाढत आहे, पण म्हाताऱ्या जर्मनांना परंपरा मोडवत नाही. ग्रेटब्रिटनमध्ये मात्र दहन लोकप्रिय होत चालले आहे. येत्या वर्षी तेथे दफनापेक्षा दहनांची संख्याच अधिक भरेल. अमेरिकेत दहन अजून लोकप्रिय होत नाही. कॅथॉलिक लोकांचा तर दहनाला फारच विरोध आहे. जेथे कॅथॉलिक वस्ती ज्यास्त, तेथे दहनांची संख्या कमी आढळते. काही मोठ्या अमेरिकन शहरांत, एकावर एक असे आठ देह पुरण्याची शक्कल निघाली आहे. शहराबाहेर दफनासाठी भरपूर जागा मिळू शकली तरी ती राखून ठेवण्याची दक्षता अद्याप घेतली जात नाही.

### फिलिपाइन्सच्या तांदुळाची आयात

फिलिपाइन्सने भारताला २५ हजार मेट्रिक टन तांदूळ पुरविण्याचे कंत्राट मिळविले आहे. त्या देशांतील तांदुळाचे उत्पादन अगदी अलीकडच्या काळापर्यंत त्यालाच पुरत नव्हते. परंतु तेथे आयआर ८ ह्या नव्या जातीच्या भाताची लागवड करण्यात येऊ लागल्यापासून हे चित्र पालटले आहे. आता तो देश तांदुळाची निर्यात करणाऱ्या देशांत नव्यानेच सामील झाला आहे. फिलीपाइन्समधील आंतरराष्ट्रीय तांदूळ संशोधन केंद्राने वरील नव्या जातीच्या भाताचा शोध लावला. जगातील तांदुळाचे उत्पादन गरजेच्या मानाने गेली कित्येक वर्षे कमी पडत आहे. जपानसारख्या देशात तांदुळाची जागा गव्हाने म्हणजे पावाने घ्यावी म्हणून जोरदार प्रयत्न करण्यात आले. त्याचा परिणाम होऊन जपानच्या आहारातील तांदुळाचे महत्त्व कमी झाले आहे.

### २९,००० फुटांचा 'महात्मा' अनुबोधपट

"महात्मा" ह्या नावाच्या, ५½ तास चालणाऱ्या २९,००० फूट लांबीच्या अनुबोधपटाचे २ ऑक्टोबर रोजी उद्घाटन होणार आहे.


तारेचा पत्ता "मॉर्गेज"

मुख्य कार्यालय दूरध्वनी क्र. २६१४९७
उपकार्यालय दूरध्वनी क्र. २५६५२७

**मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँक लि., मुंबई**

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, डुगल रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटी रु. ५६ कोटी येणे आहेत.


नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

ये. स. बोरगांवकर
कार्यकारी संचालक




महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले "विजय"-नांगर वापरा.




४, ६ व ८ बैली फाळ व सुटे भाग

तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ऑक्टोबर २, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## भारताला कर्जफेडीसाठी नवी कर्जे

परदेशी हुंडणावळीच्या उपलब्धतेची परिस्थिती अत्यंत तंगीची झाल्यामुळे, कर्जफेडीसाठी सवलती मिळविण्याचे खास प्रयत्न करणे आवश्यक झाले. १९५८ पासून भारताला आर्थिक मदत देण्याचे कामी महत्त्वाची भूमिका पार पाडीत असलेल्या जागतिक बँकेने भारताच्या संकटनिवारणाचे कामी पुढाकार घेतला आणि स्वतःही त्यासाठी साहाय्य केले; भारताने जागतिक बँकेची ४६० लक्ष डॉलरची १९६७–६८ मध्ये परतफेड करावयाची होती, ती त्याला करता यावी ह्यासाठी तिने रिझर्व्ह बँकेत ४६० लक्ष डॉलरची ठेव ठेवली. १९६७–६८ च्या पहिल्या सहामाहीत भारताने ग्रेटब्रिटनची मुद्दल व व्याज मिळून ३३० लक्ष डॉलरची फेड करावयाची होती. ती करता यावी ह्यासाठी ग्रेटब्रिटनने त्या रकमेचे भारताला नवे कर्ज दिले. कॅनडाचे भारताने १०० लक्ष डॉलर द्यावयाचे होते, ते भारताला देता येईनात. म्हणून कॅनडाने ते आपले सर्व येणे राइटऑफ केले. ज्या कर्जदाराकडून वसुली होऊ शकत नाही, त्याचे कर्ज राइटऑफ करतात; म्हणजे जुन्या कर्जफेडीसाठी नवे कर्ज देण्यापेक्षा हा प्रकार अपमानास्पद आहे. प. जर्मनी आणि जपान ह्यांनी आपल्या कर्जांच्या अटी सौम्य करून भारताची सोय पाहिली. ऑस्ट्रियानेहि असेच केले. एडइंडिया कॉन्सोर्टिअमने मे, १९६८ मध्ये भारताला १००० लक्ष डॉलर्सची जुन्या कर्जफेडीसाठी मदत देण्याचे ठरविले.

## शिस्तीशिवाय मदत व्यर्थ जाईल

जिनिव्हा येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या व्यापार व विकास परिषदेत संघटनेचे चिटणीस डॉ. प्रेबिश ह्यांनी अविकसित देशांना परदेशाकडून मिळणाऱ्या मदतीबद्दल उचित असा इशारा दिला आहे. ते म्हणाले की, विकसनशील देशांना मिळणाऱ्या आंतरराष्ट्रीय आर्थिक मदतीची मोठ्या प्रमाणावर जुळणी करण्यात आली, तरीसुद्धा ह्या देशांनी आर्थिक विकास साधण्याची शिस्त जर पाळली नाही तर तिचा काही उपयोग होणार नाही. विकसनशील देशांपैकी जे देश स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे प्रयत्न करीत आहेत, अशाच देशांना अधिकाधिक मदत दिली जाण्याचा सध्याच्या परिस्थितीत संभव दिसतो. विकासासाठी मदत घेऊ इच्छिणाऱ्या देशांनी आपल्या उत्पादनात सतत वाढ करीत राहिले पाहिजे आणि आपल्या निर्यातीत स्थिरता राखण्याची खटपट केली पाहिजे. अशा प्रकारच्या यशस्वी प्रयत्नांमुळे त्यांना वाढत्या प्रमाणात मदत मिळण्याची शक्यता उत्पन्न होईल. पण त्याचबरोबर प्रगत देशांनी हे लक्षात घेतले पाहिजे की विकसनशील देशांतील अंतर्गत साधनसंपत्तीच्या जुळवाजुळवीला परदेशांतून येणाऱ्या साह्याचा आधारही मिळाला पाहिजे. ज्या देशांनी विकासाच्या कामी नियमित प्रयत्न चालविले आहेत त्यांना परदेशांतील खाजगी मालकीच्या भांडवलाकडून भरघोस मदत मिळण्यास अडचण पडणार नाही. परदेशांतील खाजगी भांडवलाने विकसनशील देशांना उत्पादनाची आधुनिक तंत्रे पुरविण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. परंतु उत्पादनाच्या नवीन क्षेत्रात पदार्पण करण्याचे धैर्य ते दाखवीत नाहीत. जे उत्पादनक्षेत्र रूढ झालेले आहे, त्यातच गुंतून राहण्याची त्याची वृत्ती दिसते.

---

## सोयाबीनच्या लागवडीचा कार्यक्रम

सोयाबीन ह्या धान्याच्या लागवडीचा एक कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. ह्या कार्यक्रमाप्रमाणे १९६९–७० सालात २० हजार टन सोयाबीन उत्पादन करण्यात यावयाचे आहे. १९७३–७४ पर्यंत त्याची लागवड वाढविण्यात येऊन ४० हजार टन उत्पादन करण्यात यावयाचे आहे. सोयाबीनमध्ये प्रथिने भरपूर असतात. परंतु त्याच्या डाळीचा अगर तेलाचा उपयोग करण्याची भारतात प्रथा नाही. हे धान्य शिजविण्यास कठीण असते आणि त्याच्यातील तेलाचा अंश शेंगदाण्याच्या मानाने बराच कमी असतो. त्यामुळे लोकांना सोयाबीन आवडत नाही. तथापि, आधुनिक औषधे तयार करण्यासाठी त्याचा चांगला उपयोग होत असल्याने औषधांच्या कारखान्यांकडून १० हजार टनांची तातडतोबीची मागणी आहे. त्याशिवाय टिकाऊ अन्न-पदार्थ करण्यासाठी १० हजार टनांची आणखी गरज आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस सोयाबीनची मागणी २० हजार टनांनी वाढेल असा अंदाज आहे. अमेरिकेतून ४४ टन सोयाबीनचे बियाणे आयात करण्यात आले होते. त्यापासून नवे बियाणे तयार करण्यात येत आहे. १९६९–७० सालच्या हंगामासाठी १,००० टन बियाणे देशातच तयार होईल. तसे म्हटले तर सोयाबीन हे धान्य भारताला नवीन नाही. काश्मीर-पासून नागालँडपर्यंत उत्तरेकडील डोंगरी विभागात त्याची लागवड करण्यात येत असते. परंतु स्थानिक लोकांच्या खाण्या-साठीच ती होत असते. सोयाबीनच्या पिकामुळे जमिनीचा कस वाढतो असे आढळून आले आहे.

## शेतकऱ्यांची भरभराटीची नवी क्षितिजे

आर्थिक विकास साधण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नामुळे भारतामधील प्रांतांप्रांतीची माणसे स्थलांतर करीत आहेत. अशा स्थलांतरामुळे राष्ट्रीय ऐक्य बळकट होण्यास नकळत मदत होत असते. राजस्थानात होणाऱ्या नव्या कालव्यांमुळे तेथे शेतीचा धंदा बरकतीचा होणार आहे. ह्या संधीचा फायदा घेऊन कालव्याच्या ओलिताखाली भिजणाऱ्या जमिनी मिळविण्यासाठी १ लाख पंजाबी शेतकऱ्यांनी अर्ज केले आहेत. वडिलार्जित जमिनीचा व मालमत्तेचा मोह सोडून भरभराटीची नवी क्षितिजे हस्तगत करण्याची स्वप्ने ते पाहात आहेत. कच्छच्या रणाच्या पश्चिमेकडील भागातील ४ हजार एकर जमीन अलीकडेच १०० शीख कुटुंबांना कसण्यासाठी देण्यात आली आहे. ही जमीन पाकिस्तानच्या हद्दीपासून अवघी ६० किलोमीटर अंतरावर आहे. पंजाबमध्ये सुधारलेल्या व एकरी अधिक पिके देणाऱ्या बेण्याचा वापर करून भरघोस उत्पादन करण्यात येत आहे. त्यामुळे जमिनीच्या किंमती अतिशय वेगाने वाढत चालल्या आहेत. ह्या परिस्थितींत आपली मूळची जमीन चढ्या भावाने विकून दुसरीकडे स्वस्तात जमिनी घेण्याची प्रवृत्ती वाढीला लागणे साहजिक आहे. पाणी मिळण्याची हमखास सोय आणि शेतीत मिळविलेला अनुभव ह्यामुळे पंजाबी शेतकऱ्यांना कोणत्याही ठिकाणी सोने पिकवता येईल असा आत्मविश्वास वाटू लागला आहे. पंजाबमधील शेतकरी अधिक भरभराटीच्या आशेने बाहेर पडत आहे, तर इतर प्रांतांतील लोक तिकडे जात आहेत. पंजाबमधील वेतनाचे मान खूप वाढलेले आहे, त्यामुळे इतर राज्यांतील मजूर वाढत्या प्राप्तीच्या आशेने तिकडे आकृष्ट होत आहेत. पंजाबला जवळ असलेल्या राज्यांतूनच नव्हे तर मद्राससारख्या दूरस्थ राज्यातून मजूर पंजाबात मोठ्या प्रमाणावर जात आहेत.

---

## फुलांच्या निर्यातीने परदेशी चलनाची प्राप्ती

परदेशांना करण्यात येणारी निर्यात वाढवून परदेशी चलन मिळविण्याचे भारताचे प्रयत्न सतत चालू आहेत. अनेक प्रकारचा माल निर्यात करण्यात येतो. त्याचप्रमाणे देठासकट फुले निर्यात करूनही परदेशी चलन मिळविण्याची शक्यता आहे. परदेशांत फुलांना फार मोठी मागणी आहे. ती पुरविण्यासाठी अमेरिकेसारखे शास्त्रीयदृष्ट्या प्रगत असलेले देश खूप खटपट करतात. फुले दीर्घकाल टिकविण्यासाठी उपाय योजण्यात येतात. त्यामुळे दोनदोन महिने टिकणारी फुले निर्यात करणे शक्य होते. भारतांत अनेक प्रकारची फुले आहेत. दरसाल सुमारे ९·२६ कोटी रुपयांच्या फुलांची देशांतर्गत विक्री होते. दिल्ली, कलकत्ता, मुंबई सारख्या मोठ्या शहरांतून दररोज सुमारे ३ हजार पौंड गुलाबाची फुले विकण्यात येतात. पण त्यांचा बहर अल्पकाळ टिकतो.


**"अर्था"चा दिवाळी अंक**

**( १६ ऑक्टोबर, १९६८ )**

"अर्था" चा येता अंक हा दिवाळीचा मोठा अंक असून तो दिवाळीपूर्वी वाचकांच्या हाती पडेल.

मराठी वाङ्मयात
अजरामर झालेल्या
**माणदेशी**
**माणसांच्या**
सेवेसाठी
माण तालुक्यात
व्यापारी बँकेचे
प्रथमच पदार्पण

म्हसवड ( जि. सातारा )
येथे
बुधवार दि. २ ऑक्टोबर
गांधीजयंतीचे दिवशी
चौतीसाव्या शाखेचे
**उद्‌घाटन**

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

रा. ना. गोडबोले
अध्यक्ष

वि. श्री. दामले
जनरल मॅनेजर

य. र. तारळकर
शाखाधिकारी, म्हसवड

मुख्य कचेरी–चिरमुले निकेतन
राजपथ–सातारा
( स्थापना–१९३६ )

## पाकिस्तानचा यंत्रांचा कारखाना

रशिआ आणि पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान ढाका येथे एका करारावर सह्या करण्यात आल्या. पूर्व पाकिस्तानात भारी यंत्र-सामग्री तयार करण्याचा कारखाना काढणे कितपत शक्य आहे त्यासंबंधी रशिआने अहवाल तयार करण्याचे मान्य केले आहे. संकल्पित कारखाना काढण्यासाठी १५ कोटी रुपयांचा खर्च येईल. कारखान्यात खनिज तेलाच्या धंद्यासाठी लागणारी, सिमेंटच्या कारखान्याची व खताच्या कारखान्याची यंत्रसामग्री उत्पादन करण्याचा इरादा आहे.

---

## औद्योगिक प्रदर्शनात भारताचे दालन

झाग्रेब येथे भरविण्यात आलेल्या औद्योगिक प्रदर्शनात भारतामधील १०० कंपन्यांनी आपला माल मांडला आहे. यंत्रसाहित्य, वाहतुकीची साधने, विजेची उपकरणे, इत्यादी माल तेथे धाडण्यात आला आहे. १९५३ साली भारत व युगोस्लाव्हिआ ह्यांच्यामधील व्यापार अवघा १ लाख डॉलर्सच्या मालाचा होता. ह्या वर्षी तो ५ कोटी डॉलर्सच्या घरात जाईल. भारत युगोस्लाव्हि-आकडून यांत्रिक हत्यारे, बोटींची एंजिने, रसायने व औद्योगिक कच्चा माल ह्याची आयात करतो, व चहा, कॉफी, कातडी व कातड्याच्या वस्तू निर्यात करतो.

---

## घर खाली करण्याचा निर्णय

राजकोटमधील एक घरमालक केरळमधील एका गावी रहात होता. त्याला कर्क रोगाची बाधा झाल्यामुळे राजकोटला यावे लागले. राजकोटला त्याचे घर होते. परंतु ते भाड्याने दिलेले होते. भाडेकरी जागा सोडण्यास तयार नव्हता. घरमालकाला तर आपले अखेरचे दिवस स्वतःच्या घरातच घालविण्याची तळमळ लागली होती. म्हणून त्याने भाडेकऱ्याविरुद्ध जागेचा कबजा मिळविण्यासाठी दावा दाखल केला. मॅजिस्ट्रेटने घरमालका-ची परिस्थिती लक्षात घेऊन जागा खाली करण्याचा हुकूम केला.

---

## खोट्या चलनी नोटांचा बंडखोरीसाठी उपयोग ?

एडवर्ड जॉर्ज विल्सन ह्या कृष्णवर्णीय दक्षिण आफ्रिकी मुद्रकाला १२,५०,००० पौंड किंमतीच्या १०० डॉलरवाल्या अमेरिकन चलनी नोटा बनावट छापल्याबद्दल लंडनमधील फौजदारी कोर्टाने ६ वर्षे कैदेची शिक्षा केली आहे. ह्या चलनी नोटा युरोपात आणि दक्षिण अमेरिकेत काळ्या बाजारात खपविल्या जात असत. ह्या चलनी नोटा अर्जेंटिनामध्ये पाठवाय-च्या, त्या वटवून तेथील खरे चलन मिळवायचे आणि बंडखोरांना पैशाचा पुरवठा करावयाचा, असा त्या नोटा छापवून घेणाराचा डाव असल्याचे विल्सनने कोर्टाला सांगितले.

## धार्मिक भावना क्रिकेटपटूला रविवारी खेळू देत नाही

ब्रायन बूथ ह्या ऑस्ट्रेलियन कसोटी क्रिकेटपटूने रविवारी क्रिकेटच्या सामन्यात खेळण्याऐवजी फर्स्ट क्लास क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्याचे १,५०० डॉलर्सचे नुकसान होणार आहे. न्यू साउथ वेल्स बेनिफिट फंडातून ज्यांचे ३० कसोटी सामने खेळून झालेले असतील, अशांना प्रत्येक कसोटी सामन्याचे ५० डॉलर बक्षीस दिले जातात. ब्रायन बूथचे २९ सामने खेळून झाले आहेत; आणखी एक सामना खेळल्यावर तो १,५०० डॉलर्सच्या बक्षिसास पात्र झाला असता. ब्रायन बूथ हा उत्कृष्ट फलंदाज असून, १९६६ मधील इंग्लंडविरुद्धच्या कसोटी सामन्याचा तो कप्तान होता. डावखोरा गोलंदाज जे. डब्ल्यू मार्टिन ह्यानेही रविवारी खेळण्यास नकार दिला आहे. रविवार हा ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा दिवस म्हणून विश्रांतीचा आणि प्रार्थनेचा दिवस पाळण्याची ख्रिस्तांची परंपरा आहे. १९६४ साली ऑस्ट्रेलिआने भारताचा दौरा केला, तेव्हा ब्रायन स्मिथ हा उपकप्तान होता आणि तो रविवारी सामने खेळला होता. “ मी खेळावयास नको होते. पण न खेळल्याने संघाचे नुकसान झाले असते; संघाला माझी गरज होती म्हणून मी खेळलो” असे त्याने म्हटले आहे.


# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

**मुंबई**

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — ९, बँक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

: विभागीय कचेरी : — महाल नागपूर.

दूरध्वनी :– २५९८६४, २५९९९७, २५०१८९, २५९६६७

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल व गंगाजळी फंड | ... रु | ११,९८,८४,००० |
| ठेवी | ... रु. | ६३,१८,९३,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,१३,२३,७१ ००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे, सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. वसंतराव पाटील, चेअरमन

डॉ. वा. सु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

### महात्माजींचे ३५ कोटी भाऊ

महात्मा गांधी एकदा उत्तर प्रदेशाच्या दौऱ्यावर असताना एका शाळेला भेट देण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला. ते नेहमीप्रमाणे कंबरेला पंचा गुंडाळून शाळेत गेले. त्यांच्या अंगात कुडता नव्हता. हे पाहून शाळेतील एका मुलाने त्यांना एक कुडता देऊ केला. पण महात्माजींनी तो नाकारला. ते म्हणाले की मी एकट्यानेच कुडता वापरला तर माझ्या भावाला त्याबद्दल वैषम्य वाटेल. तेव्हा त्या मुलाने महात्माजींच्या भावालाही कुडता देण्याची तयारी दाखविली, आणि आणखी किती भाऊ आहेत अशी विचारणा केली. त्यावर महात्माजी म्हणाले की भारतामधील ३५ कोटी लोक हे सर्वच माझे भाऊ आहेत. महात्माजींच्या उत्तराचे मर्म मुलाला कळले. महात्माजी मात्र पंचा नेसूनच वावरत राहिले.

---

### निर्गतीखेरीज नाश अटळ आहे

"चवथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात आपल्या निर्गतीत दरसाल किमान ७% ची वाढ होत गेली, तरच आपली राष्ट्रीय आर्थिक प्रगती टिकून राहील. आताची आपली अवस्था अशी आहे, की आपल्या निर्गतीमुळे मिळणाऱ्या उत्पन्नाचा फार मोठा भाग परराष्ट्रीय कर्जफेडीसाठीच द्यावा लागणार आहे. परदेशांच्या मदतीच्या टिकाऊपणाबद्दल साशंकता आहे. आवश्यक ती सर्व आयात करता यावयाची असेल, तर निर्गतीचे प्रमाण खूपच वाढवायला हवे. शेती आणि उद्योगधंदे ह्यांच्याप्रमाणे निर्गतीलाही प्राधान्य दिले, तरच हे शक्य होईल. निर्गत होऊ शकणाऱ्या जिनसांचा अंतर्गत वापरही कमी करावा लागेल. उत्पादन खर्च कमी करून मालाचा दर्जा सुधारणेही निकडीचे आहे.":—नियोजन मंडळाचे उद्योगधंद्याचे सभासद, श्री. आर. वेंकटरामन्. ...

---

### पिटिशन रायटरचा महसूल मंत्री पुनः पिटिशन रायटर

मामलेदार कचेरीत अर्ज लिहिण्याचा धंदा करणारे श्री. फकिरचंद गुप्ता पंजाबमध्ये महसूल मंत्री झाले, पण तेथे राष्ट्रपतींची राजवट आल्यामुळे त्यांना पुनः पूर्वीच्या धंद्याकडे वळावे लागले आहे. त्यांनी पिटिशन रायटरच्या लायसेन्ससाठी अर्ज केला आहे.

---

### केनेडीच्या कागदपत्रांची ८० लक्ष रु.ना विक्री

सेनेटर रॉबर्ट केनेडीचा खून झाल्यानंतर त्यांच्या वैयक्तिक दप्तरात क्युबा प्रकरणाचे काही महत्त्वाचे कागदपत्र सापडले, ते केनेडीच्या मृत्युपत्राच्या एक्झिक्यूटर्सनी मॅकॉल कॉर्पोरेशनला ८० लक्ष रुपयांना विकले आहेत. हे कागदपत्र आता प्रसिद्ध केले जातील.





**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —


* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

**BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES**

*Make doubly sure by fitting*



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

## डबाबंद अन्नपदार्थ खाण्याची वाढती प्रवृत्ती

ब्रिटनच्या अन्न व शेतीखात्याने तेथील लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयींविषयी अलीकडेच एक पाहणी केली होती. त्यावरून ब्रिटिश नागरिकांच्या आहाराच्या पद्धतीत कसा बदल झाला आहे ते दिसून येते. ब्रिटिश स्त्रिया स्वयंपाकाची कटकट टाळू लागल्या आहेत. ताज्या भाज्या, ताजी फळे, अशा सारखे पदार्थ स्वतः करून कुटुंबाला खाऊ घालण्यापेक्षा डबाबंद अन्नपदार्थांचा उपयोग त्या अधिकाधिक प्रमाणात करू लागल्या आहेत. हवाबंद डब्यात भरलेले मासाचे पदार्थ तशाच भाज्या व सूप बाजारातून आणून वाढण्याची त्यांची प्रवृत्ती बळावलेली आहे. ह्याचे प्रमुख कारण असे आहे की अधिकाधिक स्त्रिया घराबाहेर पडून कामे करू लागल्या आहेत. अर्थातच त्यांना स्वयंपाकाकडे लक्ष देण्यास वेळ आणि हौस ही दोन्हीही नसतात. स्वयंपाकघरांतील कष्टांविरुद्ध त्यांनी बंडाचा झेंडा उभारला आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. वातावरणात झालेल्या ह्या बदलातून घरीच राहणाऱ्या स्त्रियाही सुटलेल्या नाहीत. ब्रिटनमध्ये दिसणारे हे चित्र कमीअधिक प्रमाणात सर्वच औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांतून दिसून येते. ह्या बाबतीत अमेरिका इतर सर्व देशांच्या मानाने दोन पावले पुढेच आहे. तथापि, ब्रिटनमध्ये आलेल्या व स्थायिक झालेल्या परदेशी स्त्रिया मात्र तयार अन्नपदार्थांवर भागविण्याच्या आहारी गेलेल्या नाहीत. त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना घरी बनविलेलेच पदार्थ अधिक आवडतात. भारतांतही मोठ्या शहरांतून डबाबंद अन्नपदार्थ वापरण्याकडे झुकता कल दिसून येतो. परंतु अशा पदार्थांचे उत्पादन अजून विविधतेने होत नाही आणि त्यांच्या किंमतीही सामान्य हिंदी नागरिकांच्या खिशाला परवडणाऱ्या नाहीत. एरव्ही ब्रिटनमधील चित्र भारतात उमटण्यास हरकत नाही.

---

## धान्य साठविण्यासाठी धातूच्या कणग्या

मध्यवर्ती सरकारच्या अन्नखात्याने धान्याची साठवण करण्यासाठी धातूच्या कणग्या ग्रामीण भागात लोकप्रिय करण्याचा एक कार्यक्रम आखला आहे. सुगीच्या दिवसांनंतर शेतकऱ्यांपुढे व व्यापाऱ्यांपुढे पिकलेले धान्य नीट टिकावे म्हणून त्याच्या साठवणीचा प्रश्न उभा राहतो. ह्या वर्षी पंजाब, हरिआना आणि पश्चिम उत्तर प्रदेश ह्या राज्यांतून रब्बीचे पीक मुबलक आले. परंतु शेतकऱ्यांजवळ पिकांच्या साठवणीची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे हंगाम जोरात सुरू झाल्यावर त्यांना आपल्या जवळचे धान्य बाजारात विक्रीला आणण्यासेरीज गत्यंतर राहिले नाही. अर्थात त्याचा परिणाम धान्याचे भाव एकदम घसरण्यात होऊ लागला आणि सरकारच्या अन्नमहामंडळाला बाजारात मोठ्या प्रमाणावर खरेदी करून भाव सावरून धरावे लागले. धान्याच्या साठवणीसाठी खात्याने धातूच्या कणग्या करवून घेतल्या आहेत. पश्चिम उत्तर प्रदेशात अशा २० कणग्या शेतकऱ्यांना प्रयोगादाखल वापरण्यास देण्यात आल्या आहेत. आंध्र प्रदेशात विजयवाडाजवळही धातूच्या व प्लॅस्टिकच्या कणग्या शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. धान्याच्या टिकाऊ साठवणीच्या सोयी नसल्यामुळे भारतात पिकाची फार नासाडी होते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेच्या अंदाजाप्रमाणे ही नासाडी १० टक्क्यांच्या घरात जाते, तर इतर काही तज्ज्ञांच्या मते ती ५० टक्क्यांपर्यंत जाते. भारत सरकारच्या अन्नखात्याने धान्याची वाहतूक आणि साठवण होतांना ९·३ टक्के धान्य वाया जाते असा अंदाज केला आहे.

---

## भारताच्या विकासाला साहाय्य करणारे प्रमुख देश

(एप्रिल, १९५१–मे, १९६८)

| देश | मदत देणाऱ्या देशाने मंजूर केलेली रक्कम (कोटी रु.) | भारताने वापरलेली रक्कम (कोटी रु.) |
|---|---|---|
| अमेरिका | ६,३६१ | ५,८४७ |
| जर्मनी | ८०२ | ६८८ |
| ग्रेट ब्रिटन | ६२० | ५५३ |
| रशिया | १,०३२ | ५४६ |
| कॅनडा | ५०१ | ३८५ |
| जपान | ३३२ | २५४ |
| फ्रान्स | १५६ | ६७ |
| ऑस्ट्रेलिया | ५७ | ५४ |
| झेकोस्लोव्हाकिया | ९९ | ४४ |
| नेदरलंडस् | ५२ | ३७ |
| युगोस्लाव्हिया | ९४ | २६ |
| पोलंड | ६५ | २१ |
| इटली | १५३ | २० |
| स्वित्झरलंड | ३६ | २० |
| ऑस्ट्रिया | २१ | १४ |
| बेल्जम | २१ | १० |
| नॉर्वे | ९ | ९ |
| डेन्मार्क | १४ | ७ |
| न्यूझीलंड | ६ | ५ |
| स्वीडन | ७ | ३ |
| हंगेरी | २५ | — |
| बल्गेरिया | ११ | — |
| **आंतरराष्ट्रीय संस्था** | | |
| जागतिक बँक | ७५६ | ६५० |
| आय. डी. ए. | ६६६ | ६३२ |

“लक्ष्मीची पाउलें”



उंबरठ्यावर माप ठेविले, मी पायाने उलटूनि आले

गृहलक्ष्मीच्या मंगल आगमनाबरोबर अनेक जबाबदाऱ्याही तुमच्यावर आल्या आहेत. त्या व्यवस्थित पार पाडण्यास पैसे हवेत.
परंतु ते थोडेच झाडाला लागतात ? छे, ते तर सांठवावे लागतात.
ह्याकरितां आजच महाराष्ट्र बँकेत बचत खाते उघडा.

आपली जिव्हाळ्याची बँक.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छेः ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले-कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगाव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्यानजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

दातांच्या स्वच्छतेसाठी

माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

## कोलंबो योजनेतून भारताला मिळालेली मदत

आर्थिक भरभराटीच्या आणि समृद्धीच्या युगात प्रवेश करण्यासाठी भारत अनेक पुढारलेल्या देशांकडून मदत घेत आहे. ह्या मदत देणाऱ्या देशांत ऑस्ट्रेलिआ हाही एक देश आहे. त्या देशाकडून भारताला कोलंबो योजनेप्रमाणे मदत मिळत असते. चालू वर्षाच्या ३० जून अखेरपर्यंत ह्या योजनेप्रमाणे ऑस्ट्रेलिआने भारताला २७ कोटी, ६७ लाख रुपयांची मदत दिली आहे. त्यांपैकी बराच मोठा भाग म्हणजे २४ कोटी, ८८ लाख रुपयांची रक्कम आर्थिक विकासाच्या कामावर खर्च करण्यात आली आहे. बाकीची मदत निराळ्या स्वरूपात देण्यात आली आहे. हिंदी विद्यार्थ्यांना व तंत्रज्ञांना प्रशिक्षण देणे, ऑस्ट्रेलिआतून भारतात काम करण्यासाठी तज्ज्ञ उपलब्ध करून देणे व तांत्रिक साधने मिळवून देणे, अशा स्वरूपाची ही मदत आहे. कोलंबो योजना १८ वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेली आहे. तेव्हापासून ८६४ हिंदी विद्यार्थ्यांनी व तंत्रज्ञांनी ऑस्ट्रेलिआत जाऊन शिक्षण घेतले आहे. ह्याच अवधीत आणखी ३०३ विद्यार्थ्यांनी पोस्टाच्या द्वारे तांत्रिक व इतर अभ्यासक्रम पुरा केलेला आहे. ऑस्ट्रेलिआने आशिआतील देशांच्या आर्थिक विकासासाठी १ अब्ज, ३० कोटी, ३५ लाख रुपयांची मदत केलेली आहे. त्यांपैकी ८६ कोटी, ६४ लाख रुपये आर्थिक विकासाच्या कामावर खर्च करण्यात आले आहेत आणि ४३ कोटी, ७० लाख रुपयांची रक्कम तांत्रिक सहकार्याशी संबंधित अशा बाबींवर खर्च करण्यात आली आहे. १९५० पासून आशिआतील देशांतील ८ हजार विद्यार्थ्यांनी कोलंबो योजनेचा फायदा घेऊन ऑस्ट्रेलिआत शिक्षण घेतले आहे.

---

## मुंबई-अहमदाबाद नवा रेल्वे मार्ग

ह्या वर्षीच्या पावसाळ्यात तापी व नर्मदा ह्या नद्यांना महापूर आल्यामुळे मुंबई व अहमदाबाद ह्यांच्या दरम्यानचे दळणवळण बरेच दिवस तुटले होते. त्यामुळे व्यापाराची व लोकांची खूप अडचण झाली होती. पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी ह्यावर उपाय म्हणून मुंबई ते अहमदाबाद जळगावमार्गे जाणारा रेल्वे रस्ता सुरू करावा अशी सूचना रेल्वे बोर्डाला केली आहे. नुकत्याच होऊन गेलेल्या पुराच्या वेळी ह्या मार्गावरून काही गाड्या सोडण्यातही आल्या होत्या. त्याचा फार उपयोग झाला. रेल्वे बोर्डाने पश्चिम रेल्वेची सूचना मान्य केली तर मुंबई व अहमदाबाद ह्या दोन राजधानींच्या शहरांमधील मालाची वाहतूक ह्या नव्या मार्गाने कायमची करण्यात येण्याचा संभव आहे. सुरत ते भुसावळ मार्गावरच उधनापासून भुसावळला जाणारा एक नवा मार्ग बांधण्याचेही सुचविण्यात आले आहे.

---

## खादीच्या उद्योगात ८ लाखांना रोजगार

खादीच्या उद्योगधंद्यासंबंधी ताजी आकडेवार माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. ह्या उद्योगधंद्यांत १८ लाख, २३ हजार लोकांना रोजगार मिळालेला असून त्यांची वार्षिक प्राप्ती १७.४२ कोटी रुपयांची आहे. सर्व प्रकारच्या खादीची मार्च, १९६७ अखेर २३.६१ कोटी रुपये किंमत होती. ह्यापैकी २०.८८ कोटी रुपये किंमतीची खादी नेहमीच्या विक्रीला पुरी पडणारी होती आणि २.७३ कोटी रुपये किंमतीची खादी मात्र जादा होती. नेहमीच्या चरख्यात १ चाती असते आणि अंबर चरख्यात ४ चात्या असतात. हा हिशेब जमेस धरून एकूण चात्यांची संख्या सुमारे २० ते २१ लाख असावी. काही राज्यांत खादीच्या उद्योगधंद्यात गुंतलेल्या लोकांचे व त्यांनी मिळविलेल्या रोजगारीचे १९६६-६७ सालचे आकडे असे आहेत. आंध्रप्रदेश ९४ हजार लोक : प्राप्ती १३५ लाख; आसाम ११ हजार लोक : प्राप्ती १० लाख; बिहार ३ लाख, ८० हजार लोक : प्राप्ती २८३ लाख; गुजरात ३० हजार लोक : प्राप्ती ५५ लाख; जम्मू व काश्मीर १९ हजार लोक : प्राप्ती १८ लाख; केरळ २३ हजार लोक : प्राप्ती ४१ लाख; मध्यप्रदेश १४ हजार लोक: प्राप्ती १७ लाख; मद्रास ३ लाख, ३८ हजार लोक : प्राप्ती २९५ लाख; महाराष्ट्र ५ हजार लोक : प्राप्ती १९ लाख; म्हैसूर ५२ हजार लोक : प्राप्ती ५१ लाख; ओरिसा ४३ हजार लोक : प्राप्ती १७ लाख; पंजाब २ लाख, ३३ हजार लोक : प्राप्ती १७३ लाख; राजस्थान ८३ हजार लोक : प्राप्ती १०१ लाख रुपये.

---

## लोखंडाच्या खनिजाची आयात जपान कमी करणार

ओरिसामधील परद्वीप बंदरातून जपानला लोखंडाच्या खनिजाची निर्यात करण्यात येत असते. ह्या बंदराची खोली पुरेशी नसल्यामुळे जपानच्या मोठ्या बोटी खनिज भरण्याकरता बंदरात येऊ शकत नाहीत. त्यामुळे जपान भारताकडून आयात करीत असलेल्या खनिजात कपात करण्याचा विचार करीत आहे. सध्या जपानला लागणाऱ्या लोखंडाच्या खनिजापैकी २५ टक्के माल तो देश भारताकडून आयात करीत आहे. माल भरणाऱ्या छोट्या बोटी पाठवाव्या लागल्यामुळे जपान आता २० टक्केच खनिज आयात करणार आहे. बंदरातील पाण्याच्या अपुऱ्या खोलीमुळे ओरिसातील इतर खनिजांची जपानला होऊ शकणारी निर्यातही अडून राहिली आहे. गोवा, विजगापट्टम् व मद्रास येथील बंदरांतील अपुऱ्या सोयीसंबंधीही जपानी बोट वाहतूक कंपन्यांची तक्रार आहे.

---

### तिरुपतीला जाण्यासाठी रुंद रुळाचा रेल्वेरस्ता

तिरुपती हे दक्षिण भारतामधील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. तीर्थक्षेत्राला हजारो यात्रेकरू दरसाल येत असतात. पण त्यांच्या प्रवासाची समाधानकारक सोय नाही. तिरुपतीला जाण्यासाठी रेणुगुंठा स्टेशनपासून अरुंद रुळावरून चालणारी रेल्वेगाडी आहे. हा मार्ग १८८७ साली बांधण्यात आलेला आहे. यात्रेकरूंची गर्दी वाढत चालल्यामुळे तो सध्या फार अपुरा पडतो. म्हणून रेणुगुंठा ते तिरुपती रेल्वेमार्ग रुंद रुळाचा करण्याचे काम हाती घेण्यात आले होते. हे काम आता पूर्ण होत आले आहे. तिरुपती येथील यात्रा २४ सप्टेंबरला सुरू होते. त्यापूर्वी नवा मार्ग चालू होईल अशी रेल्वे अधिकाऱ्यांची अपेक्षा आहे. मार्ग पुरा झाल्यावर रायचूर, विजयवाडा व मद्रास ह्या ठिकाणांहून थेट तिरुपतीला जाता येईल. गाडी बदलण्याची पाळी येणार नाही.

---

### वंशाधिष्ठित भेदभावाची खोल पाळेमुळे

अमेरिकेत नीग्रो वंशाच्या लोकांना भेदभावाने वागविले जाते. दक्षिणेतील अमेरिकन राज्यांतून भेदभावाची ही भावना विशेष खोल रुजलेली आहे. अमेरिकेतील अनेक क्लबात फक्त गोऱ्या लोकांनाच प्रवेश देण्यात येतो. एखाद्या क्लबाने नीग्रोंना सभासद करून घ्यावयाचे ठरविल्यास बहुतेक गोरे लोक त्या क्लबाच्या सभासदत्वाचा राजीनामा देतात. अशाच एका प्रतिष्ठित क्लबाने वंशभेदाची वृत्ती खेळांच्या क्षेत्रातही दाखविली आहे. ह्या क्लबातील टेनिसपटूंचा दुसऱ्या एका क्लबांतील टेनिसपटूंशी सामना ठरला होता. परंतु त्या दुसऱ्या क्लबात नीग्रोंना प्रवेश आहे असे कळल्यावर पहिल्या क्लबाने सामना खेळण्याचे नाकारले. नवल असे की सामना खेळण्याचे नाकारणाऱ्या क्लबाच्या सभासदांत अमेरिकेचे संरक्षण खात्याचे चिटणीस आणि अमेरिकेचे ब्रिटनमधील वकील ह्यांचा समावेश आहे.

---

### शेतीच्या पाणीपुरवठ्याचे प्रश्न

आनंद येथील सरदार पटेल विद्यापीठात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ प्रा. कॉलीन क्लार्क ह्यांचे शेतीच्या व्यवसायाच्या विकासासंबंधी भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, खोल असलेले पाणी उपसून शेतीला देण्याचे भारतामधील दर फार जबर आहेत. वीज आणि पाणीपुरवठा साधण्याच्या दृष्टीने जी मोठाली धरणे बांधण्यात आली आहेत त्यांच्यापासून होणारा पाणीपुरवठा मात्र स्वस्त आहे. कारण, विजेची निर्मिती झाल्यानंतरच ते पाणी शेतीसाठी उपलब्ध होते. धरण जितके मोठे तितके त्याचे पाणी शेतीसाठी स्वस्त पडते. इजिप्तमधील आस्वान धरण आणि भारतामधील भाक्रा-नांगल धरण ह्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरतात.

अर्थ (पाक्षिक) महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते. वा. व. रु. ६=०० ट. ख. सह "दुर्गाधिवास" पुणे ४.



SCG-1 HIN

# नहीं–
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में, ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



बबल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५३३७२ कारखाना : ३५६१०२




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९३५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.